CNR NO.MHSO060004832026

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०२६</u>**

तात्यासाहेब पवार

**वि.**

महाराष्ट्र शासन, वगैरे

## <u>निशाणी क्रमांक २८ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.१ ते ९ यांचेविरुध्द पुढील आदेशापर्यंत वादमिळकतीबाबत 'आहे ती परिस्थिती' कायम (status quo) ठेवणेबाबत आदेश मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी हे वादमिळकतीचे अधिग्रहण न करता बेकायदेशीर रस्ता निर्माण करत आहेत. दाव्याचे समन्स व तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाची नोटीस मिळुनही त्यांनी म्हणणे दाखल केलेले नाही. दिवाणी प्रकरणांसाठी असलेल्या उन्हाळी सुट्टीचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी हे वादमिळकतीतुन रस्ता तयार करतील अशी भिती असल्याने पुढील आदेशापर्यंत वादमिळकतीबाबत आहे ती परिस्थीती कायम ठेवण्याचा आदेश करण्यात यावा ही विनंती.

३. अर्जावर प्रतिवादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. तथापि, त्यांनी म्हणणे दाखल केले नाही. निशाणी क्र.७ ते २४ वरील समन्स व नोटीसचे अहवाल पाहता, असे दिसते की, बजावणी होवुनही केवळ प्रतिवादी क्र.८ व ९ हे प्रकरणात हजर झाले. इतर कोणीही हजर नाहीत. प्रतिवादी क्र.८ व ९ यांना मुदत देवुनही त्यांनी म्हणणे मांडले नाही. दावा व त्यासोबत जोडलेले कागदपत्र व फोटो पाहता असे दिसते की, रस्त्यावर खडी टाकण्यात आलेली आहे. म्हणजेच खडी टाकण्याच्या पलीकडे रस्त्याचे काम झालेले नाही, अशी परिस्थिती आज रोजी दिसते. प्रतिवादी यांना संधी देवुनही त्यांनी म्हणणे न मांडल्याने पुढील तारखेपर्यंत वादमिळकतीबाबत आहे ती परिस्थिती दोन्ही पक्षांनी कायम ठेवण्याचा आदेश करणे योग्य होईल. करिता, खालील आदेश.

# <u>आदेश</u>

१) वादी व प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत वादमिळकतीबाबत 'आहे ती परिस्थिती' (status quo) कायम ठेवावी.

२) सदरील आदेश संगणकात अपलोड करण्यात यावा जेणेकरुन गैरअर्जदार प्रतिवादी व त्यांचे विधिज्ञ यांना याबाबत माहिती होईल.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

NILESH SUBHASH BUDRUK
Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK
Date: 2026.05.08 17:23:48 +0530

(नीलेश सु. बुद्रुक)

दि. ०८.०५.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 08.05.2026 |
| (d) | Uploaded on | : | 08.05.2026 |